देशोन्नती

अकोला | गुरूवार | दि. ८ ऑगस्ट २०२४

## फेरफटका

# गणगणे विद्यालयात सायबर सुरक्षा कार्यशाळा

देशोन्नती वृत्तसंकलन



अकोट : स्थानिक श्रीमती लक्ष्मीबाई गणगणे कनिष्ठ महाविद्यालयात नुकतीच सायबर सुरक्षेबाबत कार्यशाळा पार पडली.

यावेळी अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयातील सुमित सपकाळ व अनिकेत भुडके या सायबर वॉरियर्सनी ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडीयाचा वाढता वापर व त्यामधून होणारी फसवणूक, ऑनलाइन खरेदी, नवनवीन ॲप, फेसबुक अकाउंट हॅक कसे केले जाते, फेक वेबसाईटस कशा ओळखाव्या या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. ही कार्यशाळा क्विक हिल फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर यांच्या सहयोगाने प्राचार्य डॉ. जगदीश साबू आणि डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. कार्यशाळेचे अध्यक्ष मुख्याध्यापक काकडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षक पाटील, पवार, झाडे, मानकर, वानरे, घाटे, चेडे, लोणारे यांच्यासह विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते. (श.प्र.)

Akola Edition

Aug 8, 2024 Page No. 7

Powered by: erelego.com